# 'तापी'ने गाठले सहार रोड स्थानक

## मेट्रो-३ मार्गावरील भुयारीकरणाच्या १६ व्या टप्प्याचे काम पूर्ण



### भुयारीकरणासाठी १७ 'टीबीएम'

**भुयारीकरणासाठी सध्या १७ टीबीएम यंत्रे कार्यरत आहेत. ही यंत्रे उतरवण्यासाठी मार्गिकेवर मोठी विवरे (लाँचिंग शाफ्ट) खोदण्यात आली आहेत.**

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. ८ : कुलाबा ते सीप्झ या मेट्रो-३ मार्गावरील भुयारीकरणाच्या १६ व्या टप्प्याचे काम सोमवारी पूर्ण झाले. 'तापी' हे टनेल बोअरिंग मशीन (टीबीएम) सहार रोड मेट्रो स्थानक येथे भुयारीकरण पूर्ण करून बाहेर आले.

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील टर्मिनल- २ येथून २२ एप्रिलला 'तापी-१' यंत्राने भुयारीकरणाला सुरुवात केली होती. या यंत्राने टर्मिनल-२ ते सहार रोड मेट्रो स्थानक हे ६८७ मीटर अंतराचे भुयारीकरण पूर्ण केले आहे. या मार्गिकेनंतर मेट्रो-३ च्या भुयारीकरणाचा १६ वा टप्पा पूर्ण झाला. त्यामुळे मेट्रो-३ च्या एकूण मार्गिकेवरील ३१.६८७ कि.मी. भुयारीकरण आता पूर्ण झाले आहे.

मेट्रो-३ मार्गाच्या १६ व्या टप्प्याचे भुयारीकरण पूर्ण होण्यासाठी १०५ दिवस लागले. या ६८७ मीटरच्या भुयारासाठी एकूण ४८८ सेगमेंट रिंग वापरल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या मार्गावर एकूण २७ थांबे असतील.

पॅकिज-६ अंतर्गत आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल-२ ते सहार रोड या टप्प्यातील 'अप' व 'डाऊन' अशी दोन्ही भुयारे सोमवारी पूर्ण झाली. मेट्रो-३ ने एक महत्त्वाचा टप्पा पार केला, अशी प्रतिक्रिया 'मुंबई मेट्रो'च्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी ट्विटरद्वारे व्यक्त केली.